# मिरा-भाईंदर,वसई-विरार पोलीस आयुक्तालय
## सायबर गुन्हे शाखा
३ रा मजला, पोलीस उप-आयुक्त (गुन्हे), यांचे कार्यालय,
ओत्सवाल हाईट्सचे समोर, कनाकिया रोड, मिरारोड पुर्व, ता.जि.ठाणे
फोन नंबर – ०२२-२८११ ०१३५, व्हॉट्सअॅप हेल्पलाईन क्र. ९०० ४८८ ०१३५
**Email ID – cybercrime.mb-vv@mahapolice.gov.in**


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

प्रेस नोट :-३८३/२०२२ दिनांक :-२४ /०१/२०२२

**ऑनलाईन जेवण ऑर्डर करताना फसवणुक झालेल्या इसमाचे ६२,७९६/- रुपये परत मिळविण्यात सायबर गुन्हे शाखेस यश.**

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय अंतर्गत नयानगर पोलीस ठाणेचे हद्दीत राहणारे तक्रारदार नामे तौसिफ रहेमान चौहान यांनी झोमॅटो ऑनलाईन अॅपवर जेवणाकरीता ऑर्डर दिली होती.परंतु त्यांनी केलेले पेमेंट ऑर्डर केलेल्या ठिकाणी न झाल्याने त्यांनी गुगलवर असलेल्या झोमॅटो कस्टमर केअर मध्ये फोन केला होता. सदर कस्टमर केअर मधुन बोलत असलेल्या व्यक्तीने तक्रारदार यांना ऑनलाईन पैसे परत करण्याकरीता स्कॅनचकोड पाठवुन १ रु पाठविण्यास सांगितले. तक्रारदार यांनी स्कॅन कोड करुन १ रु पाठविल्यानंतर तक्रारदार यांच्या बँक खात्यातुन १,३७,०००/- रु.कपात होवुन झाल्याबाबत तक्रारी अर्ज केला होता.

सदर अर्जाचे अनुषंगाने पोलीस उपनिरीक्षक शेनोळकर यांनी तक्रारदार यांचे झालेल्या ट्रान्झॅक्यनच्या अनुषंगाने मोबीक्विक तसे धनी अॅपसोबत पत्रव्यवहार करण्यात आला आहे.सदर पत्रव्यवहारचे अनुषंगाने तक्रारदार यांना धनी अॅपच्या माध्यमातुन झालेल्या ट्रान्झॅक्शन पैकि एकुण ६२,७९६/- रु तक्रारदार यांचे खात्यावर अवघ्या १ तासात परत करण्यात आले आहेत.

सदरची कामगिरी डॉ.श्री.महेश पाटील,पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री.अमोल मांडवे, सहा.पोलीस आयुक्त (गुन्हे), मि.भा.व.वि.पोलीस आयुक्तालय यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री.सुजितकुमार गुंजकर, पोउपनिरी/प्रसाद शेनोळकर,मपोशि/सुवर्णा माळी, मपोशि/माधुरी धिंडे यांनी उत्कृष्टरित्या पार पाडली आहे.

- सायबर गुन्हे शाखा संपर्क क्रमांक :- 022-2811 0135
- सायबर गुन्हे शाखा व्हॉट्सअॅप हेल्पलाईन क्रमांक :- 900 488 0135
- सायबर गुन्हे शाखा ई-मेल आयडी :- **cybercrime.mb-vv@mahapolice.gov.in**

---oo---